२५ मार्च २०००

१० रुपये

# साप्ताहिक सकाळ

## गृहसजावट विशेषांक



- संकल्पना
- संरचना
- आविष्कार

अंजली / अश्विन लव्हेकर


# छोट्या व अडचणीच्या जागा कशा सजवाल ?

घरातल्या काही जागा छोट्या, तर काही अडचणीच्या असतात. त्यांचा उपयोग करून घेणे, कौशल्याचे असले, तरी कठीण नसते. अशा जागा कशा सजवता येतील याचे मार्गदर्शन.



गृहसजावट हा विषय मध्यम-उच्च मध्यमवर्गामध्ये अत्यंत आवडीचा झाला आहे. थोडे पैसे (म्हणजे किती याला मर्यादा नाही) जवळ साठले, की घरासाठी खर्च करावेत ही इच्छा प्रत्येक गृहिणीच्या मनात येते. असे कष्टाने मिळवलेले पैसे स्वतःच्या घरावर खर्च करायचे असले, तर ते अत्यंत खुबीने केले पाहिजेत. त्या पैशाने घर 'सजवणे' म्हणजे निरुपयोगी; पणआकर्षक अशा वस्तू घरात आणणे नव्हे, तर आपल्या आधीच सतत कमी पडणाऱ्या जागेचा खुबीने उपयोग करणे होय!

अशा जागा कुठे व कशा सापडतात, याची २-३ उदाहरणे पाहू; पण त्या आधी तुम्हाला एक गुपित सांगायला हवे. बऱ्याच वेळा आम्ही डिझायनर असलो, तरी जागेचा वापर काय म्हणून करावा याची कल्पना थोड्या फार प्रमाणात आमचे ग्राहकच देऊन जातात. यासाठीच घराच्या इंटिरिअरबाबतीत घरातील प्रत्येक व्यक्तीला बोलते करणे व त्यांच्या सवयींबाबत माहिती



**लहानशा बेडभोवती तयार केलेल्या स्टोरेजमुळे त्याला एक पर्सनल टच आला आहे.त्या बेडभोवती एक स्वतःचे विश्व तयार झाले आहे.**


◄ डावीकडे-
**जिन्याखालील जागेचा असाही उपयोग. लहानशी लायब्ररी व जमीनलगत असणारे ड्रॉवरसारखे दिसणारे पुल आऊट सीट.**

करून घेणे आवश्यक असते. मग आमचे काम फक्त राहते 'कसे करायचे?' काय करायचे, हे नाही.

आपण पहिल्या उदाहरणाबद्दल बोलू. हे एक रो हाऊसच्या जिन्याखालील जागेचे चित्र आहे. सुखरानी म्हणून या दांपत्याची पुस्तकांची आवड फोटो पाहूनच लक्षात येते. त्यांना डिस्प्ले करायला आवडतील, अशी पुस्तके निवडून जिन्याखाली त्यासाठी जागा करण्याचे आम्ही ठरवले. दिवसभराच्या धावपळीत न लागणारी ही पुस्तके कोपऱ्यात बसूनसुद्धा आपले अस्तित्व सतत जाणवून देतात. ही पुस्तके लिव्हिंग रूमचा भाग नाहीत; पण ती दुर्लक्षित नाहीत. जिन्याखालील जागेचा वापर मोठे ड्रॉवर करून वापरायचे आम्ही ठरवले. ते करत असतानाच सुखरानींना जाणीव झाली, की आपल्या लिव्हिंग रूममध्ये पाचच लोक बसू शकतात. आणखी दोन सीटची आवश्यकता त्यांना वाटू लागली. सर्व फर्निचरचे काम संपत आले असताना दोन सीट या लहानशा जागेत वाढवणे आम्हाला पटेना. एरवी घरात दोनच लोक असताना सात लोकांचे परमनंट सीटिंग म्हणजे गर्दीच झाली असती. म्हणून आम्ही शक्कल लढवून तीन फूट रुंद जिन्याच्या सर्वांत खालच्या जागेचा वापर पूल आऊट सीट म्हणून केला. एरवी दोन्ही सीट जिन्याखाली सरकवून ठेवता येतात, त्यामुळे जागा मोकळी राहते. वरच्या खोल ड्रॉवरचा उपयोगही जास्तीचे पडदे, टेबल, लीनन कुशन, कव्हर्स, सोफा कव्हर्स ठेवण्यास उत्तम प्रकारे होतो. आधीच म्हटल्याप्रमाणे, ग्राहकाच्या स्पेसिफिक गरजेमुळे जिन्याखालील जागेचा उपयोग कसा झाला याचे हे एक चांगले उदाहरण आहे.

आता दुसरे उदाहरण घेऊ. ही खोली आहे मोघे दांपत्याच्या लहान मुलाची. या खोलीत त्याचा सिंगल बेड हा नुसताच ठेवण्यात मजा नव्हती. रात्री झोपताना वाचता येईल अशी सोय असलेला त्याचा स्वतःचा कॉर्नर तयार करावसा आम्हाला वाटला. स्वतःच्या खोलीत त्याचे स्वतःचे छंद जपले जावेत ही आमची इच्छा. आजकाल पलंगाजवळ पुस्तक ठेवणारी तरुण मुले विरळाच! आजकाल बेडसमोर एक टीव्ही हवा, ही मागणी जास्त दिसते. असो. या एक लहानशा बेडभोवती तयार केलेल्या स्टोरेजमुळे त्याला एक पर्सनल टच आला आहे. या दोन साईटच्या स्टोरेजमुळे त्या बेडभोवती एक स्वतःचे विश्व तयार झाले आहे. थोडी प्रायव्हसीही मिळाली आहे व वार्डरोबची जागा पार्टिशनमुळे वेगळी राहिली आहे. थोडक्यात, ही एक विचार करून



**शोभा लिव्हींग हॉलची**
➤ सोफा सेटस् ➤ साईड टेबल ➤ कॉर्नर रॅक
➤ टी. व्ही. ट्रॉली ➤ मॅगझीन रॅक ➤ लॅम्प शेड
➤ कँडल स्टँड ➤ शू रॅक आणि खूप काही...




VASTU SHOBHA
House of Interiors

**गृहसजावटीचे अलिशान दालन**
प्लॉट नं. १६, शिवाजी हौ. सो., सेनापती बापट मार्ग,
पुणे ४११ ०१६. फोन : ५६७७९०२
वेळ : स. १० ते दु. १ आणि दु. ४ ते सायं. ८.३० पर्यंत

MEDIALINE/VASTU/02-2000





**कॉलमच्या दर्शनी भागात काही सुंदर वस्तूंसाठी जागा व मागील भागात म्युझिक सिस्टिम-सीडी कॅसेटसाठी ड्रॉवर. (त्याच साईजमध्ये ड्रॉवर केला आहे.)**

उजवीकडे ➤


**कॉलममुळे तयार झालेलं शेल्फ लहान आकर्षक वस्तू ठेवण्यासाठी वापरलं आहे.**

सजवलेली खोली दिसते.

हे तिसरे उदाहरण आहे मोघे यांच्याच घरातील लिव्हिंग रूमच्या मध्ये येणारा, सर्वांनाच अडचणीचा वाटणारा कॉलम! पूर्णतः नाहीसा करता येणे अशक्य असलेला हा कॉलम बऱ्याच विचारांती आम्ही उपयुक्तरीत्या वापरावयाचा ठरवला. या कॉलमला चारही बाजूंनी वाढवून मोठे केले. बरोबर सीडीएस मावतील एवढ्या रुंदीने तो चारही बाजूंनी वाढला. या मोठ्या बॉक्सच्या दर्शनी भागात काही सुंदर वस्तू ठेवण्यासाठी कोनाडे केले व मागील भागात भरपूर सीडी व कॅसेट मावतील एवढे लहान डॉवर केले. चार फूट उंचीपर्यंत हे ड्रॉवर घेऊन वर सीडी सिस्टिमसाठी कप्पा तयार केला. याच कॉलममध्ये सीडी सिस्टिमचा वूफर पण मावतो. या हुशारीने वापरलेल्या जागेमुळे म्युझिक सिस्टिम व त्याच्याबरोबर येणारा सर्व पसारा नजरेआड राहतो.

आता चौथे उदाहरण आमच्या घरातील आहे. कॉलम मध्ये येत असल्यामुळे तयार झालेले हे छोटे शेल्फ व कपाट. लहान लहान आकर्षक वस्तू ठेवायला चार इंची शेल्फही पुरतात. फार मोठ्या शो केसने जागा अडवून ठेवण्याची गरज नसते. या वस्तू आमच्याकडे घर होण्याआधीपासून होत्या. त्या सर्व वस्तूंसाठी योग्य जागा मिळाली जी कशाच्याही मध्ये अडथळा म्हणून होत नाही.

या व अशा अनेक जागा आपल्या सवयी व आवडी-निवडीतून निघू शकतात. थोडा नीट विचार केला, तर तुम्ही स्वतःच तुमच्या घरातील सर्व जागा योग्य रीतीने वापरू शकाल. घर सुंदर दिसण्यासाठी ते 'घर' दिसण्यासाठी किंवा त्यातून तुमचे व्यक्तिमत्त्व समोर आणण्यासाठी फक्त जागा लागत नाही. फक्त पैसे लागत नाहीत, लागतो तो एक दृष्टिकोन! ◆



**डायनिंग व लिव्हिंग रूममधील स्टोरेज युनिट व वाढवलेला कॉलम येथे दिसत आहे.**

***अंजली व अश्विन लव्हेकर***

*पुण्यामध्ये व्यवसाय करणारं तरुण आर्किटेक्ट दांपत्य. 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ इंटिरिअर डिझाइन' या संस्थेतर्फे घेण्यात येणाऱ्या स्पर्धेत 'लहान घर' आणि 'लहान ऑफिस' या विभागामध्ये लागोपाठ दोन वर्षं पारितोषिक.*